दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १२६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 30 December 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 126 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## कार्यकर्ते शिरसाटांच्या घराबाहेर जमा


**मुंबई**–छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास अवघे २४ तास शिल्लक असताना, महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच चिघळला आहे. भाजपच्या पाचव्या प्रस्तावात शिवसेनेच्या ताब्यातील ७ महत्त्वाच्या जागा भाजपकडे गेल्याची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांचा संयम सुटला. जर कार्यकर्त्यांवर अन्याय होणार असेल, तर मी निवडणूक लढणार नाही, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त करत जंजाळ यांना अश्रू अनावर झाले. या नाट्यमय घडामोडींनंतर शेकडो कार्यकर्त्यांनी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या निवासस्थानाकडे कूच केली असून, शहरात राजकीय तणाव निर्माण झाला आहे.शिवसेना आणि भाजपमध्ये जागावाटपासाठी आतापर्यंत नऊ बैठका होऊनही तोडगा निघालेला नाही. भाजपच्या ताज्या प्रस्तावानुसार, जंजाळ समर्थकांचे वर्चस्व असलेले आणि शिवसेनेचे बालेकिल्ले मानले जाणारे ७ प्रभाग भाजपला देण्याचे प्रस्तावित करण्यात आल

# दोन गुजराती आपल्याला गिळायला निघालेत तुझं-माझं करू नका, तुमची निष्ठा विकू नका

## एकही माणूस फुटता कामा नये; उद्धव ठाकरेंची शिवसैनिकांना भावनिक साद

### निष्ठा न विकण्याचे शिवसैनिकांना आवाहन

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत (मनसे) झालेल्या युतीबाबत बोलताना त्यांनी वास्तववादी भूमिका मांडली. ज्यावेळी युती किंवा आघाडी असते, त्यावेळी १०० टक्के आपल्या मनासारखे घडत नाही. काही जागा आपल्या हक्काच्या असतात, पण नायलाजाने त्या मित्रपक्षासाठी सोडाव्या लागतात. मला माहिती आहे की काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असेल, पण मुंबई आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी हा वाईटपणा घ्यायला तयार आहे. तुम्ही मात्र तुमची निष्ठा विकू नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.



**राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केली असून, मुंबईसह राज्यातील महापालिकांमध्ये आता 'ठाकरे' बंधूंचा करिष्मा पाहायला मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती टीका करतानाच, कार्यकर्त्यांना एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले असताना आपण जर आपसात भांडत बसलो, तर ही लढाई न लढलेलीच बरी, अशा शब्दांत त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे भाजपविरोधात कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले, भाजपला महाराष्ट्रात कोणी ओळखत नव्हते, आम्ही त्यांना राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाडी नेले. आम्ही ज्यांना मोठे केले, आज तेच आमच्यावर वार करत आहेत. भाजपने केवळ युती तोडली नाही, तर ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. इतकी वर्षे ज्यांनी आपला केवळ उपयोग करून घेतला, त्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे. या युतीचा मुख्य उद्देश मुंबईवरील मराठी माणसाचे वर्चस्व टिकवून ठेवणे हाच आहे. राज ठाकरे यांनीही यापूर्वीच जाहीर केले आहे की, मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा मराठी माणसाचाच महापौर बसेल आणि तो आपल्या युतीचाच असेल. मुंबई कोणाही परक्याच्या हातात हिसकावू देणार नाही, असा ठाम निर्धार उद्धव ठाकरे यांनी केला.

### एकही माणूस फुटता कामा नये, कार्यकर्त्यांना साद

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात अत्यंत भावनिक आवाहन केले. तुम्ही एकदा माझ्या खुर्चीत बसून बघा आणि समोरच्या चार माणसांना निवडून दाखवा, म्हणजे जबाबदारी काय असते हे समजेल. विभागप्रमुखांनी आणि शिवसैनिकांनी अजिबात डगमगून जाऊ नका. माझ्या महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी जगाच्या नजरेत वाईट ठरलो तरी चालेल, पण आपली ताकद विखुरली जाता कामा नये, असे त्यांनी कार्यकर्त्यांना बजावून सांगितले.

## माणुसकीला काळिमा! अक्कलकुव्यातील पोटच्या गोळ्याची नदीपात्रात निर्दयी विल्हेवाट; समाज कधी जागा होणार?

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

ज्या समाजात आपण राहतो, तिथे नात्यांची विण किती सैल झाली आहे, याचे भयंकर उदाहरण अक्कलकुवा तालुक्यातील सोरापाडा शिवारात समोर आले आहे. एका निष्पाप, ६ ते ७ महिन्यांच्या नुकत्याच ' जन्मलेल्या चिमुकल्याचा मृतदेह वरखेडी नदीच्या कोरड्या पात्रात फेकून देण्यात आला. ज्या आई-वडिलांनी या बाळाचे रक्षण करायला हवे होते, त्यांनीच आपल्या पापकर्मावर पांघरुण घालण्यासाठी या जीवाला कचऱ्यासारखे सोडून दिले. ही घटना केवळ गुन्हा नसून मानवतेच्या नावावर लागलेला एक मोठा कलंक आहे.शनिवार, २७ डिसेंबर रोजी सायंकाळी सोरापाडा येथील वरखेडी नदीपात्रात स्थानिकांना या पुरुष जातीच्या अर्भकाचा मृतदेह आढळला. माहिती मिळताच पोलीस पाटील शरद वळवी यांनी पोलिसांना पाचारण केले. रक्ताच्या नात्यांनीच नाकारलेल्या या जीवाचा शेवट अत्यंत वेदनादायी स्थितीत झाला. अक्कलकुवा पोलिसांनी अज्ञात पालकांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ९४, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जन्माची लपवणूक करण्यासाठी किंवा सामाजिक भीतीने या बाळाला तिथे टाकले असावे. पण प्रश्न असा उरतो की, रक्ताच्या नात्याला असे उघड्यावर टाकताना त्या पालकांचे हात का थरथरले नाहीत? आज तंत्रज्ञान आणि प्रगतीच्या युगात आपण आहोत, पण विचारांनी आपण अश्मयुगापेक्षाही मागे जात आहोत का? अशा निष्ठूर वागणुकीमुळे समाजाची मान शरमेने खाली झुकली आहे. असे वागणाऱ्यांना समाजाचा सवाल: हवे कशाला बाळ, जर सांभाळता येत नसेल? जर जबाबदारी घेण्याची हिंमत नसेल, तर एका जीवाला जगात आणून त्याला अशा पद्धतीने वाऱ्यावर सोडण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?

कायद्याच्या चौकटीत अशा गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा व्हायलाच हवी, जेणेकरून भविष्यात कोणाचेही हात अशा कृत्यासाठी धजावणार नाहीत.जर बाळ नको असेल तर सरकारी संस्था, अनाथालये किंवा पाळणाघरे असे कायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत. तिथे बाळ सोपवणे सुरक्षित असते, पण त्याला अशा प्रकारे मरण्यासाठी सोडून देणे हा अघोरी प्रकार आहे.पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांच्या सह सहाय्यक फौजदार नूर पिंजारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल आदिनाथ गोसावी आता स्थानिक रुग्णालये, आशा वर्कर आणि अंगणवाड्यांच्या माध्यमातून दोषींचा शोध घेत आहेत. हा गुन्हा अत्यंत गंभीर असून, अशा नराधम पालकांना शोधून त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही घटना केवळ वाचून,ऐकूण सोडून देण्यासारखी नाही. आपल्या आजूबाजूला असे काही संशयास्पद प्रकार घडत असतील, तर वेळीच पोलिसांना कळवा. आज एक निष्पाप जीव गेला, उद्या ही वेळ कोणावरही येऊ शकते. माणुसकी जपण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची आहे.

## भुमी अभिलेख कार्यालया तील कर्मचाऱ्यांला दहा हजार रुपयाची लाच घेताना लिपिकाला रंगेहात पकडले

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज येथील भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिक माणिक अण्णासाहेब वाघमारे याला बोरगाव येथील एका शेतकऱ्याकडून १० हजार रुपयाची लाच स्वीकारताना सोमवारी दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान जालना येथील लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्याअधिकाऱ्यांनी केज येथील तहसील कार्यालयाच्या समोर असलेल्या चहाच्या हॉटेलात जेरबंद केले आहे.केज तालुक्यातील बोरगाव येथील एका शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्र मोजणीनंतर कमी न करता जमीन मोजणीची फाईल निकाली काढण्या साठी केज येथील भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणीदार लिपिक माणिक अण्णासाहेब वाघमारे याने शेतकऱ्या कडे ३० हजाराच्या लाचेची मागणी केली होती.त्यापैकी ५ हजार रुपये यापूर्वीच दिले होते. व उर्वरित २५ हजार रुपये स्वीकारण्याचे त्याने पंचा समक्ष मान्य केले होते. त्यापैकी सोमवारी दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान केज येथील तहसील कार्यालयाच्या समोरील एका चहाच्या हॉटेलात २५ हजारा पैकी १० हजार रुपयाची लाच स्वीकारताना त्याला जालना येथील लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे



पोलीस उपाधीक्षक बाळू संपत्ती जाधवर,पोलीस निरीक्षक शरदचंद्र सुरेशराव रोडगे, जमादार गजानन घायवट, पोलीस नाईक गजानन खरात,गजानन कांबळे, चालक व पोलीस नाईक विठ्ठल कापसे यांच्या पथकाने रंगेहाथ पकडले. सरकार पक्षातर्फे पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांच्या फिर्यादीवरून १० हजार रुपयाची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडलेल्या माणिक अण्णासाहेब वाघमारे मोजणी लिपिक,भूमी अभिलेख कार्यालयकेज याच्याविरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई जालना लाचलूचपत विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे,अपर पोलीस अधीक्षक शशीकांत शिनगारे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप अधीक्षक बाळू जाधवर, पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे व त्यांच्या पथकाने केली.या प्रकरणाचा तपास बीड येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक समाधान कवडे हे करीत आहेत.

## साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्रांजली या विद्यार्थ्यांनीची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.प्रांजली चंद्रसेन चौरे हिची १९ वर्ष मुलींच्या महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली आहे.दि.२६ डिसेंबर २०२५ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यस्तरीय १९ वर्ष वयोगट मुलींच्या शालेय बेसबॉल स्पर्धा सफाळे ता.जि.पालघर, येथे संपन्न झाल्या.या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १९ वर्ष मुलींचा संघ सहभागी झाला होता.या संघातील कु.प्रांजली चंद्रसेन चौरे हिची महाराष्ट्र राज्य बेसबॉल संघात निवड झाली आहे.पुढील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत आहे.या विद्यार्थिनीची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाल्याबद्दल त्याचे बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर, बेसबॉलच `जिल्हा क्रीडा मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर,तालुका क्रीडा अधिकारी अनिकेत काळे सर,केज तालुका क्रीडा अधिकारी राखी यादव मॅडम,संघटनेचे अध्यक्ष श्री.दिनकर थोरात सर, बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ड. उद्धवराव कराड सर, श्री.कापसेसर मार्गदर्शिका डॉ.कविता गित्ते मॅडम या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर, श्री.तरकसे सर,कृष्णा गित्ते, केशव कराड,श्री.साखरे सर, श्री. घुले सर,श्रीमती कांदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.सदर विद्यार्थिनी राष्ट्रीय स्पर्धे साठी शुभेच्छा देण्यात आले आहेत.



### वादळी कट्टा

**जातिचे ओझे ठेव जमिनीवर**

जातीचे ओझे ठेव रे खाली
खांद्यावर का वाहतोस?
भिंती उभ्या करून जगात
स्वतःलाच का तोडतोस?

रक्त लालच, श्वास तोच
देवही एकच साऱ्यांचा,
मग भेद कसला मातीवरचा
या नाजूक मानवी संसाराचा?

नवे दिवस येऊ देत
समतेचा सूर्य उगवू दे,
द्वेषाच्या सावल्या गळून
मानुसकीला फुलू दे.

–संपादक,अजय भांगे

## भारतीय शास्त्रज्ञांचे उल्लेखनीय यश,एल व्ही एम ३-६ सटेलाईट मुळे सर्वत्र कनेक्टिव्हिटी मिळणार

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

लवकरच आपल्या देशातील राज्यातील गावातील मोबाईल टॉवर दिसायचे बंद झाले तर आश्चर्य वाटून घेऊ नका कारण इस्रो या भारतीय शास्त्रज्ञांच्या संस्थेने आत्ता पर्यंत ३४ इतर देशांसाठी सुमारे ४३४ सॅटेलाइट उपग्रहांमध्ये सोडले आहेत आणि या सर्वांचा एक भारतीय म्हणून आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.त्यामध्ये दोनचदिवसांपूर्वी इस्रोच्या शास्त्रज्ञांनी आणखी एक मोठे अभूतपूर्व यश मिळवले आहे.त्यामध्ये त्यांनी एल व्ही एम ३-६ हा सॅटेलाइट लॉन्च केला आणि या सॅटेलाईट लॉन्च मुळे आता येणाऱ्या काळात आपल्याला सॅटेलाइट द्वारे नेटवर्क कनेक्टिव्हिटी साठी फार मोठी मदत होणार आहे येणाऱ्याकाळात आपल्या देशात,गावात,जिल्ह्यात असणारे मोबाईल टॉवर आपल्याला दिसले नाहीत तर आश्चर्य वाटून घेऊ नका कारण इसरो ने आत्ता सोडलेल्या या सॅटेलाइट मुळे ही क्रांती शक्य झाले आहे.भारत आणि अमेरिकेच्या या

संयुक्त मोहिमेत आता भारताचा एल व्ही एम थ्री हा अमेरिकेच्या ब्ल्यू बोर्ड ब्लॉक टू ची कनेक्ट होईल आणि मोबाईल व टेक्नॉलॉजीच्या अनेक क्षेत्रात पुढील काळात हे क्रांतिकारक पाऊल ठरेल घनदाट जंगल असो समुद्र असो अथवा वाळवंटअसो तेथे तुम्हाला सॅटॅलाइटद्वारे नेटवर्क मिळू शकेल. कारण दोन दिवसांपूर्वी भारताने या सोडलेल्या सॅटॅलाइटची क्षमता खूप मोठी आहे सुमारे साडे सहा हजार किलो वजनाचा हा सॅटॅलाइट आहे आणि भारतीय शास्त्रज्ञांनी ५२ दिवसाच्या कालावधीत केलेली ही दुसरी मोठी यशस्वी क्रांती आहे.कारण ५२ दिवसा पूर्वीच आपण पहिले एक सॅटॅलाइट सोडले होते. त्यामुळे इसरो आणि भारत हे इतर देशांसाठी आता सॅटॅलाइट सोडणारे एक सबस्टेशन झालेले आहे.५२०० किलोमीटर च्या अंतर पार करून हे सॅटॅलाइट अमेरिकेच्या ब्ल्यू बोर्ड ब्लॉक टू सी कनेक्ट होईल आणि लवकरच याचा उपयोग फक्त मोबाईल नेटवर्क साठी नाही तर संरक्षण क्षेत्रात जिथे आपल्या पाणबुडी आणि सीमा रेषेवर नेटवर्क कमी पडते त्यासाठी सुद्धा उपयुक्त होईल अंतराळ यान क्षेत्रात आपली ताकद व टेक्नॉलॉजी दाखवून एका वेगळा उंचीवर नेणाऱ्या भारतीय शास्त्रज्ञांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार तर त्यासाठी अर्थ पुरवठा करणाऱ्या भारतीय सरकारचे सुद्धा मनःपूर्वक अभिनंदन ये नया भारत है रुकेगा नही जय हिंद धन्यवाद

असे अजय पाटील विटा रेणावी यांनी सांगितले आहे.



# नववर्षाचे स्वागत करा,जरा जपुन!




दैनिक वादळ वार्ता

इंग्रजी नवीन वर्ष आनंदाचा क्षण जरी असला तरी आपापल्या संस्कृतीच्या माध्यमातून नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. कारण भारतात अनेक धर्म,अनेक पंथ, अनेक भाषा अशा विभिन्नतेतून अखंड भारताची निर्मिती झाली आहे. त्यामुळे पाश्चिमात्य देश कोणत्या पध्दतीने नवीन वर्ष साजरे करतात याकडे लक्ष न देता आपल्या संस्कृतीच्या व धर्माच्या आधारावर नवीन वर्षाचा कार्यक्रम साजरा करून नववर्षाचे स्वागत करावे.नववर्षाच्या निमित्ताने धर्म, संस्कृती, मानसन्मान,आदरतिथ्य यांच्या संगमातून नवीन वर्षाचे स्वागत करून जुन्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्ष सुख समृद्धीचे जावो अशी सर्वांनीच ईश्वरचरणी प्रार्थना करावी.कारण फक्त हुल्लडबाजी करून नवीन वर्ष साजरे होत नसुन कौटुंबिकतेच्या माध्यमातून साजरे केले तर याचा आनंद आगळावेगळा दिसून येईल व संपूर्ण कुटुंबात या दिवसाला एक आगळावेगळे स्वरूप येईल.काही युवा वर्ग नवीन वर्षाची मौजमस्ती फक्त नशा पाणी करून करतात व याचे गंभीर परिणाम त्या व्यक्तीला किंवा त्यांच्या कुटुंबीयांना भोगावे लागतात ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करतांना वाढत्या दुर्घटना पहाता मद्य पिवुन वाहन चालवु नये, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर टाळावा, कोणालाही त्रास होणार नाही हे लक्षात घेऊन जल्लोष करावा.आपण २०२५ चा विचार केला तर या वर्षात आतंकवाद्यांनी मानवतेला काळीमा फासणारे दोन हल्ले केलेत यामध्ये २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील अंगावर शहारे येणारा हल्ला व १० नोव्हेंबर २०२५ ला दिल्ली येथील आतंकवादी हल्ला अत्यंत भयानक होता.त्यामुळे येणाऱ्या नवीन वर्ष लक्षात येता आतंकवादी कारवायापासुन सर्वांनीच सावध रहाणे गरजेचे आहे.कारण आतंकवादी आपल्या आनंदात जहर घोळु शकतात यालाही नाकारता येत नाही.३१ डिसेंबरला सरकारने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आनंदाने नवीन वर्षाचे स्वागत व्हायला पाहिजे.कारण पोलिस विभाग आपल्याच संरक्षणाकरीता नियम बनवित असतात. अपघात होवू नये, अनुचित प्रकार घडू नये व ३१ डिसेंबर सर्वत्र शांततेत आणि आनंदात पार पडावा याच उद्देशाने पोलिस विभागाने सर्वसामान्यांच्या बचावासाठी काही अटी घालून दिलेल्या आहे त्याचे पालन व्हायलाच पाहिजे.कारण देशासह राज्यात दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणे. यामुळेच देशासह राज्यात अनेक दुर्घटना रोज होतांना दिसतात.त्याचप्रमाणे राज्यासह देशात हिट ॲंड रन चे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याने दररोज दुर्घटना मोठ्या प्रमाणात होतांना दिसते आणि हा संपूर्ण प्रकार नशेमुळे होत असतो. त्यामुळे नवीन वर्षे साजरे करतांना सतर्कता बाळगुन साजरे करावे अन्यथा आ बैल मुझे मारअशी परिस्थिती होवू शकते आणि याचे गंभीर परिणाम आपल्याला व आपल्या परिवाराला भोगावे लागु शकतात.त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या दुर्घटना होणार नाही याची काळजी घेवूनच २०२६ चे स्वागत केले पाहिजे. जनतेला मी आग्रह करतो की २०२६ आला म्हणून जास्त उत्साहित होवू नका, पदोपदी सावधगिरी बाळगा.प्रत्येक धर्माच्या लोकांनी आपापल्या संस्कृतींचे अनुकरण करून नवीन वर्षाच्या निमित्ताने आगळावेगळे सांस्कृतिक कार्यक्रम अवश्य केले पाहिजे व मंदिर-मज्जीद, गुरूव्दारा,चर्च, बौद्ध विहार इत्यादी अनेक धार्मिक देवस्थानात जाणवु दर्शन घेणे अत्यंत गरजेचे आहे.यामुळे नवीन ऊर्जा निर्माण होते.कारण इंग्रजी नवीन वर्ष असले तरी आपला धर्म व संस्कृती याला कुठेही खिंडार पडणार नाही व ठेच पोहचणार नाही याची काळजी घेऊन एक उत्साहाचा सण म्हणून सर्वांनीच नवीन वर्षाचे स्वागत करावे.यामुळे जगात नवीन वर्षाच्या निमित्ताने भारतातुन एक चांगला संदेश जाईल. भारताच्या दृष्टीकोनातून वर्षांच्या ३६५ दिवसांचा विचार केला तर आपल्याला कुठे ना कुठे प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व दिसून येते आणि त्या पध्दतीने आपण साजरे करीत असतोच. त्यामुळे नवीन वर्षाला वेगळे रूप न देता आपापल्या संस्कृतींच्या माध्यमातून साजरे करावे हेच आपल्यासाठी नवीन वर्ष ठरेल.कारण जगाच्या पाठीवर भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे.त्याचपध्दती आपणही नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. भारतात प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात मोठमोठी नामांकित पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळे आहेत.याठीकानी जाऊन भजन-कीर्तनाचा आनंद घेवून नवीन वर्षाचे स्वागत केले तर एक आगळावेगळा उपक्रम दिसून येईल व नवीन चेतना जागृत होईल.आपण दुरच्या पर्यटन स्थळांना भेट देवू शकत नसेल तर जवळच्या पर्यटन स्थळांना भेट दिली पाहिजे.त्याचप्रमाणे नवीन वर्षाच्या निमित्ताने भजन, कीर्तन,पुजाअर्चना करून जगात चांगला संदेश जावा या उद्देशाने जनजागृती केली पाहिजे.घटते वनक्षेत्र, वाढते औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे निर्माण होणारे बदलते हवामान यापासून राज्यासह देशात प्रदुषणाची मात्रा दिवसेंदिवस वाढत असून संपूर्ण सृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर आहे व सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पृथ्वीच्या रक्षणासाठी वृक्षलागवड होने अत्यंत गरजेचे आहे. याकरीता नववर्षाच्या निमित्ताने भारतासह राज्यातील प्रत्येक व्यक्तीने एकतरी वृक्ष लावले पाहिजे व नवीन वर्षाचे स्वागत केले पाहिजे तेव्हा हा एक जागतिक उपक्रम होईल. देशात १४० कोटी लोकसंख्या आहे यातील अर्ध्या लोकसंख्येने म्हणजे ७० कोटी जनतेने नवीन वर्षाच्या निमित्ताने एक जरी झाड लावले तर संपूर्ण भारतात एकाच दिवशी ७० कोटी वृक्ष लागवडीचा विक्रम होईल आणि आपल्याला हीरवागार गालीचा दिसून येईल व एकाचवेळी करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झालेली दिसेल.यामुळे गुरांना चारा व मानवाला शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे प्रदूषणावर मात करून पृथ्वीचा समतोल राखण्यास मोठी मदत होईल.नवीन वर्षाचे स्वागत सर्वांनीच अवश्य केले पाहिजे परंतु जपून!आपण सर्वांनीच शपथ घेतली पाहिजे की नवीन वर्षात नवीन संकल्प, नवीन उमंग, नवी आशा, नवीन दिशा निर्माण व्हावी याच उद्देशाने पुढचे पाऊल टाकावे. राज्य सरकारने पुढाकार घेऊन ३१ डिसेंबर २०२५ च्या निमित्ताने व २०२६ च्या आगमनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले पाहिजे.यातच नवीन वर्षाचे खरे स्वागत दिसून येईल व २०२६ या नवीन वर्षाचा वृक्षलागवडीचा आगळावेगळा उपक्रम सर्वांनीच अंगीकारला तर अनंत काळापर्यंत हा दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील व याची सुवर्ण अक्षरात नोंद होईल.नवीन वर्षांच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद !

**-रमेश कृष्णराव लांजेवार.**

# जेवल्यानंतर लगेच झोपताय?


दैनिक वादळ वार्ता

आजच्या धावपळीच्या आयुष्यात आपण अनेकदा रात्री उशिरा जेवतो आणि लगेच झोपतो. कधी कामामुळे, कधी मोबाइल किंवा टीव्ही पाहता पाहता वेळेची जाणीवच होत नाही. तुम्हाला माहिती आहे का की रात्री जेवणाची योग्य वेळ तुमच्या झोपेवर, पचनावर आणि एकूण आरोग्यावर किती परिणाम करते. आयुर्वेद असो की डॉक्टर, दोघेही यावर जोर देतात की जेवण आणि झोप यांच्यात पुरेसे वेळेचे अंतर असणे अत्यंत आवश्यक आहे.

योग्य वेळी जेवल्याने जेवण चांगले पचते. तसेच झोपही गाढ आणि शांत लागते. चला तर मग जाणून घेऊया की झोपण्यापूर्वी किती वेळ आधी जेवण करावे. याबाबत आयुर्वेद आणि डॉक्टर काय सांगतात.

**झोपण्यापूर्वी किती वेळ आधी जेवण करावे**

आयुर्वेद आणि डॉक्टरांच्या मते, चांगल्या पचनक्रियेसाठी आणि उत्तम झोपेसाठी रात्रीचे जेवण कमीत कमी २ ते ३ तास आधी करावे. इतका वेळ दिल्याने जेवणाला चांगले पचण्याची संधी



... किंवा वारंवार ॲसिड रिफ्लक्सची समस्या असते, त्यांच्यासाठी हे अंतर ३ तास किंवा त्याहून जास्त ठेवणे आणखी फायदेशीर मानले जाते. उदाहरणार्थ, जर तुम्ही रात्री १० वाजता झोपता तर ७ ते ८ वाजेपर्यंत जेवण उरकावे आणि जर ११ वाजता झोपता तर ८ वाजेपर्यंत जेवण करणे चांगले, जेणेकरून झोपताना पोट हलके राहील

**...श्यक आहे?**

१. जेवण योग्य पचते - जेवणानंतर शरीराला ते पचवण्यासाठी वेळ लागतो. लगेच आडवे झाल्यास पचनक्रिया नीट होत नाही.

२. ॲसिडिटी आणि छातीत जळजळ टाळता येते - जेवणानंतर लगेच आडवे झाल्याने पोटातील ॲसिड वर येऊ शकते, ज्यामुळे ॲसिड रिफ्लक्स, छातीत जळजळ, आंबट ढेकर यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

३. चांगली आणि गाढ झोप मिळते - झोपेदरम्यान शरीर स्वतःची दुरुस्ती करतो, मेंदूला विश्रांती मिळते आणि हार्मोन्सचे संतुलन राखले जाते. पोट जड असेल किंवा पचन सुरू असेल तर झोप वारंवार तुटते.

४. वजन आणि मेटाबॉलिझमसाठी - रात्री उशिरा जेवल्याने मेटाबॉलिझम मंदावतो, चरबी साठू लागते आणि वजन वाढण्याचा धोका वाढतो.

**रात्री काय जेवावे आणि काय टाळावे?**

रात्री हलके आणि सहज पचणारे जेवण जसे उकडलेल्या किंवा हलक्या शिजवलेल्या भाज्या, डाळ, खिचडी, थोडी रोटी किंवा भात, हलके गरम दूध (हळदी सोबत), थोडेसे बदाम किंवा अक्रोड आणि दही (कमी प्रमाणात) खाऊ शकता. तर रात्री अतिजड जेवण, तळलेले-भाजलेले आणि जास्त मसालेदार पदार्थ, जास्त गोड पदार्थ किंवा स्नॅक्स, कॅफीन (चहा, कॉफी), उशिरा फळे (विशेषतः खूप गोड किंवा जड फळे) खाणे टाळावे.

# चेहऱ्यावर संत्र्याची साल लावल्यास पिंपल्सच्या समस्या होतील दूर

दैनिक वादळ वार्ता

खराब आहार, प्रदूषण आणि अनारोग्यकारक जीवनशैलीमुळे चेहरा निस्तेज होतो. चेहऱ्यावरचे डाग, खड्डे किंवा कोरडेपणा दूर करण्यासाठी आम्ही महागड्या क्रीम आणि उपचारांवर हजारो रुपये खर्च करतो. मात्र, अनेकदा या रासायनिक उत्पादनांचे दुष्परिणाम त्वचेवर दिसू लागतात. अशा परिस्थितीत पारंपरिक पाककृती लक्षात येतात. खरं तर, संत्री खाल्ल्यानंतर आपण बऱ्याचदा फेकून देत असलेली साले प्रत्यक्षात व्हिटॅमिन सीचा एक चांगला स्रोत असतात आणि संत्राची साले त्वचेसाठी खूप प्रभावी ठरू शकतात. संत्र्याची साल ही फेकून न देता त्वचेसाठी एक नैसर्गिक वरदान ठरू शकते. संत्र्याच्या सालीमध्ये संत्र्यापेक्षाही जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, जे त्वचेचा रंग उजळण्यासाठी आणि काळे डाग कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे.

यामध्ये असलेल्या 'सिट्रिक सिड'मुळे त्वचा नैसर्गिकरित्या एक्सफोलिएट होते, म्हणजेच त्वचेवरील मृत पेशी निघून जातात आणि छिद्रांमध्ये साचलेली घाण स्वच्छ होते. तेलकट त्वचा असलेल्या लोकांसाठी संत्र्याची साल खूप फायदेशीर आहे, कारण ती चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल नियंत्रित करते आणि मुरुमांची समस्या मुळापासून कमी करण्यास मदत करते. दुसरीकडे, संत्र्याच्या



सालीमध्ये मोठ्या प्रमाणावर अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेला अकाली वृद्धत्वापासून वाचवतात.

संत्र्याची साल त्वचेतील कोलाजनची पातळी वाढवते, ज्यामुळे सुरकुत्या आणि फाईन लाईन्स कमी होऊन त्वचा अधिक तरुण आणि लवचिक दिसते. तुम्ही संत्र्याची साल वाळवून त्याची पावडर बनवून दही, मध किंवा गुलाब पाण्यासोबत फेस पॅक म्हणून वापरू शकता. हा नैसर्गिक उपाय त्वचेला केवळ थंडावाच देत नाही, तर सूर्याच्या अतिनील किरणांमुळे झालेली इजा भरून काढण्यासही मदत करतो. यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि त्वचा तजेलदार बनते.

संत्र्याच्या सालामध्ये त्वचेला नैसर्गिक चमक आणण्याचे आणि त्याचा पोत सुधारण्याचे गुणधर्म आहेत. कोणत्याही रासायनिक प्रक्रियेशिवाय घरी तयार केलेले नैसर्गिक सीरम त्वचेला खोलवर पोषण देते आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणते. हे प्रिस्क्रिप्शन केवळ स्वस्तच नाहीत तर त्वचेसाठी पूर्णपणे सुरक्षित देखील आहेत. संत्र्याच्या सालीमध्ये संत्र्यापेक्षा व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडेंट्स जास्त असतात, हे घटक सूर्याच्या अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे होणारे काळे डाग, रंगद्रव्य आणि नुकसान दुरुस्त करण्यास मदत करतात. सोलांमध्ये असलेले नैसर्गिक तेल त्वचेला मॉइश्चराइझ ठेवतात आणि कोरडेपणापासून संरक्षण करतात. संत्र्याचा सीरम तयार करण्यासाठी संत्री, लिंबू आणि पपईची साल उकळवा आणि त्यांचा रस काढा. त्यात कोरफड जेल, बदाम तेल, ग्लिसरीन आणि व्हिटॅमिन ई कॅप्सूल घाला. हे मिश्रण त्वचेसाठी नैसर्गिक बूस्टर म्हणून काम करते. आपण हे सीरम दोन आठवड्यांपर्यंत फ्रीजमध्ये ठेवू शकता.संत्र्याच्या सालामध्ये नैसर्गिक 'ब्लीचिंग एजंट्स' असतात, जे त्वचेचा टोन सुधारण्यास मदत करतात. या सीरमच्या नियमित वापरामुळे हळूहळू चेहऱ्यावरील मुरुमांच्या खुणा किंवा लहान खड्डे कमी होतात. संत्र्याचे सीरम त्वचेसाठी अत्यंत गुणकारी असते. यात मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन सी आणि अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेचा रंग उजळण्यास आणि काळवंडलेली त्वचा स्वच्छ करण्यास मदत करतात. हे सीरम चेहऱ्यावरील काळे डाग, पिगमेंटेशन आणि मुरुमांचे वण कमी करण्यासाठी प्रभावी ठरते. याव्यतिरिक्त, संत्र्याचे सीरम त्वचेतील कोलाजन वाढवते, ज्यामुळे सुरकुत्या कमी होतात आणि त्वचा घट्ट व तरुण दिसते. हे त्वचेला प्रदूषण आणि सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षण देते. नियमित वापरामुळे त्वचेचा पोत सुधारतो आणि चेहऱ्यावर एक नैसर्गिक चमक येते.

# फेस स्टिम घेण्याची योग्य पद्धत तुम्हाला माहिती आहे का?

दैनिक वादळ वार्ता

चेहऱ्यावर स्टीम घेणे ही स्किनकेअरची जुनी आणि प्रभावी पद्धत आहे. याच्या मदतीने चेहऱ्याची छिद्रे उघडतात आणि त्वचा खोलवर स्वच्छ होते. परंतु जर योग्यरित्या केले गेले तर त्याचे परिणाम खूप चमत्कारी असू शकतात. बऱ्याचदा लोक साध्या पाण्यातूनच वाफ घेतात, परंतु स्किनकेअर एक्सपर्टच्या मते, जर पाण्यात दोन खास गोष्टी मिसळल्या तर ते केवळ छिद्रे खोलवर स्वच्छ करत नाही तर त्वचेचा रंगही आतून सुधारते. आज आम्ही तुम्हाला चेहऱ्याची वाफ घेण्याचा योग्य मार्ग सांगणार आहोत, ज्यामुळे केवळ त्वचेला ओरखडे निघणार नाहीत तर भरपूर पोषणही मिळेल. वाफ घेणे हे प्रामुख्याने श्वसनसंस्थेच्या तक्रारी निवारण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरते.जेव्हा आपल्याला सर्दी, खोकला किंवा सायनसचा त्रास होतो, तेव्हा गरम वाफ घेतल्याने श्वसनमार्गातील घट्ट झालेला कफ पातळ होऊन बाहेर पडण्यास मदत होते. यामुळे बंद झालेले नाक मोकळे होते आणि घशातील खवखव कमी होते. तसेच, गरम वाफ फुफ्फुसांपर्यंत पोहोचल्याने श्वास घेताना होणारा त्रास कमी होतो आणि शरीराला हायड्रेटेड ठेवण्यास मदत मिळते, ज्यामुळे संसर्गाचा धोका कमी होतो. श्वसन विकारांसोबतच वाफ घेण्याचे सौंदर्यासाठीही मोठे फायदे आहेत.

वाफेमुळे चेहऱ्यावरील त्वचेची छिद्रे उघडतात,



ज्यामुळे त्वचेच्या आत साचलेली घाण, धूळ आणि जास्तीचे तेल सहजपणे स्वच्छ होते. यामुळे ब्लॅकहेड्स आणि मुरुमांची समस्या कमी होऊन त्वचा तजेलदार दिसते. याव्यतिरिक्त, वाफ घेतल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरातील स्नायूंना आराम मिळतो, ज्यामुळे दिवसाचा थकवा आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. तज्ज्ञ सांगतात की, म्हणतात की बहुतेक लोक फेस स्टीममध्ये साध्या पाण्याचा वापर करतात, परंतु जर हिवाळ्यात आढळणाऱ्या काही गोष्टी या पाण्यात समाविष्ट केल्या तर फायदा आणखी वाढतो. यासाठी तुम्हाला एका भांड्यात पाणी चांगले उकळावे लागेल आणि उकळत असताना त्यात संत्र्याची काही साल आणि बीटरूटच्या पानांचे लहान तुकडे घालावे लागतील. आता यानंतर, गॅसमधून पाणी काढून घ्या आणि नंतर डोक्यावर टॉवेल झाकून वाफ घ्या. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, संत्र्याची साल आणि बीटरूटच्या पानांच्या पाण्यातून जेव्हा वाफ घेतली जाते तेव्हा त्वचेची छिद्रे उघडतात आणि त्यांना नैसर्गिकरित्या जीवनसत्त्वे पुरवली जातात. अशा परिस्थितीत, जेव्हा त्वचेला थेट जीवनसत्त्वे मिळतात तेव्हा त्वचा लवकर उजळते आणि नैसर्गिक चमक येते. रक्ताभिसरण सुधारण्यातही हे खूप फायदेशीर ठरते . स्किनकेअर एक्सपर्ट्सच्या मते, ही फेस स्टीम आठवड्यातून ३ वेळा घेतली जाऊ शकते. याशिवाय जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल तर वाफवण्यापूर्वी त्वचेवर मॉइश्चरायझर अवश्य लावावे.वाफेमुळे त्वचेची छिद्रे उघडतात. आपल्या त्वचेच्या छिद्रांमध्ये दिवसभर धूळ, प्रदूषण आणि जास्तीचे तेल साचलेले असते, जे साध्या पाण्याने धुतल्याने पूर्णपणे निघत नाही. वाफ घेतल्यामुळे ही छिद्रे मोकळी होतात आणि त्यातील घाण सहज बाहेर पडते, ज्यामुळे त्वचा आतून स्वच्छ होते. यामुळे ब्लॅकहेड्स आणि व्हाईटहेड्स काढणे देखील सोपे जाते. जेव्हा छिद्रे घाणीमुळे बंद होतात, तेव्हा मुरुम येण्यास सुरुवात होते. नियमित वाफ घेतल्याने ही छिद्रे स्वच्छ राहतात आणि मुरुमांचे प्रमाण कमी होते. तसेच, गरम वाफेमुळे चेहऱ्यावरील रक्ताभिसरण वाढते. रक्ताभिसरण सुधारल्यामुळे त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतो, ज्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येतो आणि त्वचा तरुण दिसते.वाफ घेतल्याने त्वचा नैसर्गिकरित्या हायड्रेट होते. कोरड्या त्वचेसाठी हे अतिशय फायदेशीर आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वाफ घेतल्यानंतर जेव्हा आपण एखादे सीरम किंवा मॉइश्चरायझर लावतो, तेव्हा ते त्वचेच्या खोल थरापर्यंत शोषले जाते आणि त्याचा अधिक चांगला परिणाम दिसून येतो. यामुळे त्वचा मऊ, मुलायम आणि लवचिक बनते.

# वडवणी बसस्थानकाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी बस स्थानकासाठी आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होणार-नगराध्यक्ष शेषराव बापु जगताप

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

वडवणी येथील जनतेच्या जिव्हाळ्याचा व दीर्घकाळ प्रलंबित असलेला बसस्थानकाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकण्यात आले आहे. माजलगाव उपविभागीय अधिकारी

वडवणी बसस्थानकाच्या जाग्याचा

गौरव इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालया समोरील गट नंबर ६५६ मधील सरकारी जागेवरील अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.आता जागा उपलब्ध झाली.असून माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून लवकरच सुसज्ज बस स्थानकासाठी निधी उपलब्ध होणार आसल्याचे. नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप यांनी सांगितले. वडवणी तालुका होऊन अनेक वर्षाचा कालावधी लोटला परंतु जाग्या अभावी बस स्थानक करायचे कोठे असा प्रश्न पडला होता.मंगळवार दि २३ रोजी माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार वैभव महेंद्रकर, नगरपंचायतचे मुख्याधिकारी पोपट निगळ, नगर अध्यक्ष शेषेराव बापू जगताप यांनी पोलीस बंदोबस्तात वडवणी न्यायालया समोरील गट नंबर ६५६ मधील अतिक्रमण काढुन घेतले. त्या ठिकाणी साफसफाई करून वडवणी नगरपंचायत च्या वतीने तातडीने पत्र्याचे शेड उभारून तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वडवणीसह तालुक्यातील नागरिक प्रवासी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.यासोबतच, वडवणी शहराच्या विकासासाठी सातत्याने महाराष्ट्र परिवहन महामंडळ एस टी महाराष्ट्र राज्य परिवहन वडवणी प्रवाशांसाठी तातपुरते बलस्थानक पाठपुरावा करणारे लोकप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी बसस्थानकासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, येत्या काही महिन्यांत याच ठिकाणी सुसज्ज आणि कायमस्वरूपी बसस्थानक उभारले जाईल. त्यामुळे वडवणी शहराचा बसस्थानकाचा कायमचा प्रश्न पूर्णतः सुटणार आहे. वडवणीच्या सर्वांगीण विकासासाठी विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल समजले जात आहे. बीड परळी राष्ट्रीय महामार्गावर बस स्थानकाचे फलकही लावण्यात आले आहे.

# तळेगाव पाणीपुरवठा योजनेला मदतीबाबत शासन सकारात्मक-जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## संगमनेर तालुक्यात ५ कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

## तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा समितीची नव्याने रचना करण्याचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**

भोजापूर चारीच्या माध्यमातून तळेगाव पाणीपुरवठा योजनेला मदत करण्याबाबत शासन निश्चितच सकारात्मक विचार करेल. मात्र, अनेक वर्षांपासून कार्यरत असलेली तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना समिती तातडीने विसर्जित करून तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी समितीच्या कामकाजाचा आढावा घ्यावा व समितीची नव्याने रचना करावी, असे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.संगमनेर तालुक्यातील निळवंडे गावात सुमारे ४ कोटी ५८ लाख रुपये, तसेच तळेगाव येथे १ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, भीमराज चतर, विठ्ठलराव घोरपडे, निळवंडे गावाच्या सरपंच शशिकला पवार, तळेगावच्या सरपंच उषा दिघे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. तळेगाव पाणीपुरवठा योजनेच्या प्रश्नाचा उल्लेख करताना मंत्री विखे पाटील म्हणाले, वर्षानुवर्षे तीच माणसे पाणीपुरवठा समितीत राहिल्याने समितीच्या कामकाजाची स्पष्ट माहिती कोणालाही मिळत नाही. त्यामुळे समिती विसर्जित करून त्यामध्ये सर्व संबंधित गावांचे ग्रामसेवक समाविष्ट करावेत व दर महिन्याला समितीच्या कामाचा आढावा घ्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.शासन जनतेसाठी काम करीत असून दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याच्या उद्देशाने विविध निर्णय घेतले जात आहेत. भोजापूर चारीच्या कामासाठी ४४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, भविष्यात या पाण्याचा तळेगाव पाणीपुरवठा योजनेसाठी कसा उपयोग करता येईल, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करावा, असेही त्यांनी सांगितले. तसेच मालदाड पाणीपुरवठा योजनेसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही त्यांनी दिली.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत १७ कोटी रुपयांची रस्त्यांची कामे मंजूर झाल्याने मालदाड गाव मुख्य हमरस्त्याशी जोडले गेले आहे. जवळे कडलग येथे चाळीस वर्षे रस्ता नव्हता, म्हणून सिद्धेश कडलगला प्राण गमवावे लागले. काल त्या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. प्रत्येक समाजघटकाच्या पाठीशी शासन ठामपणे उभे आहे. सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून दिवसा वीजपुरवठा सुरू करण्यात आला असून, सौर पथदिवे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.यावेळी आमदार अमोल खताळ म्हणाले, शासनाने निळवंडे कालव्यावरील रस्त्याच्या कामासाठी २ कोटी ९ लाख रुपये, निळवंडे दोन डाव्या कालव्यावरील १० लोखंडी पुलांसाठी १ कोटी १३ लाख रुपये, तळेगाव येथील पाणीपुरवठा तलावासाठी ४ लाख रुपये, तळेगाव चौक सुशोभीकरणासाठी ९ लाख रुपये तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी निधी मंजूर केला आहे.



## लोणी बुद्रुकचा घनकचरा प्रकल्प राज्यासाठी 'आदर्श मॉडेल' ठरेल-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**



लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीने कार्यान्वित केलेला अत्याधुनिक घनकचरा प्रकल्प राज्यात विकसित होत असलेल्या गावांसाठी 'आदर्श मॉडेल' ठरेल, असा विश्वास राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.गोगलगाव येथे लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीने उभारलेल्या घनकचरा प्रकल्पाचे उद्घाटन पालकमंत्री श्री. विखे पाटील यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनी विखे पाटील, डॉ. विखे पाटील कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, चेअरमन नंदूशेठ राठी, व्हाईस चेअरमन सोपान शिरसाठ, प्रवरा बँकेचे व्हाईस चेअरमन मच्छिंद्र थेटे, सरपंच कल्पना मैड, दत्तात्रय राजभोज, भाऊसाहेब खाडे, अनिल विखे यांच्यासह इतर पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.सुमारे चार कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प अत्याधुनिक स्वरुपात विकसित करण्यात आला आहे. ग्रामपंचायत स्तरावर उभारण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच प्रकल्प असून, ग्रामीण भागातील हा पहिला यशस्वी प्रयोग असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले.ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प पूर्ण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करताना मंत्री विखे पाटील म्हणाले, शहर व ग्रामीण भागाची लोकसंख्या जशी वाढत आहे, तशी कचऱ्याची समस्या एक आव्हान म्हणून उभी राहणार आहे. अशा वेळी नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊन हा प्रकल्प साकारला असला, तरी भविष्यात त्याला अधिक सक्षम बनविण्याचे प्रयत्न केले जातील.लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीने माजी अध्यक्षा सौ. शालिनी विखे पाटील यांच्या पुढाकाराने नेहमीच शासनाच्या सर्व धोरणांची व योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. यामुळेच राज्य व देश पातळीवरील पुरस्काराने या ग्रामपंचायतीचा सन्मान झाला, ही बाब सर्वांसाठी अभिमानाची असल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले.लोणी बुद्रुक गावात विकसित झालेले मटण मार्केट सर्व सुविधांनी परिपूर्ण झाले असून, दोन एसटीपी (STP) प्लॅन्ट उभारण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी याप्रसंगी दिल्या. डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, या प्रकल्पामुळे कोणत्याही गावाला त्रास होणार नाही. उलट नागरिकांकडे साठणारा कचरा उचलून प्रक्रिया केंद्रावर आणण्यापर्यंत सर्वांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, कचऱ्यापासून तयार होणारे खत स्थानिक शेतकऱ्यांना कमी दरात उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## शिर्डीत साईचरणी प्रामाणिकतेचे दर्शन! महिला स्वच्छता कर्मचारीने परत केली १ लाख २६ हजारांची सोन्याची चैन

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**



श्री साईबाबांच्या मंदिरात आज माणुसकी आणि प्रामाणिकतेचा एक अत्यंत अनुकरणीय प्रसंग समोर आला आहे. साईबाबा संस्थानच्या महिला स्वच्छता कर्मचारी सौ. सुमन प्रकाश आडांगळे यांनी मंदिरात सापडलेली १ लाख २६ हजार रुपये किमतीची सोन्याची चैन मूळ मालकाला परत करून कर्तव्यनिष्ठेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

आज मंदिरात श्री साईबाबांच्या दर्शनानंतर मंदिर परिसरात स्वच्छता कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या सौ. सुमन प्रकाश आडांगळे यांना एक सोन्याची चैन आढळून आली. चैन मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता याबाबत आपल्या वरिष्ठांना माहिती दिली आणि ती चैन तातडीने संरक्षण कार्यालयात जमा केली.

सुरक्षा विभागाने या सोन्याच्या चेनची खातरजमा केली असता, तिचे वजन आणि सध्याचा बाजारभाव पाहता तिची किंमत अंदाजे १ लाख २६ हजार रुपये असल्याचे समोर आले. त्यानंतर योग्य ती पडताळणी करून संबंधित भाविकाला ती चैन सुपूर्द करण्यात आली. आपली गहाळ झालेली सोन्याची चैन परत मिळाल्याने संबंधित भाविकाने सौ. सुमन आडांगळे यांचे मनापासून आभार मानले. **वरिष्ठांकडून गौरव:**सौ. सुमन प्रकाश आडांगळे यांनी दाखविलेली तत्परता आणि प्रामाणिकपणा पाहून संस्थानच्या प्रशासनाने त्यांची तातडीने दखल घेतली. या कामगिरीबद्दल संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर साहेब तसेच पोलीस निरीक्षक रोहिदास माळी साहेब यांनी सौ. सुमन आडांगळे यांचा विशेष सत्कार केला. यावेळी सुरक्षा कर्मचारी अरुण गायके व इतर सुरक्षा कर्मचारी व अधिकारी देखील उपस्थित होते.

साईबाबा संस्थानची सुरक्षा टीम भाविकांच्या वस्तूंच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असल्याचे आणि कर्मचारी किती प्रामाणिकपणे सेवा बजावतात, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. याप्रसंगी साई संस्थान एम्पलॉइज सोसायटीचे चेअरमन विठ्ठलराव पवार, साईश्रद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संजय महाजन, ग्रीन फाउंडेशन महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तुषार महाजन, डॉ. किरण गोरे, आकाश आडंगळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिर्डीत येणाऱ्या भक्तांना केवळ देवाचे दर्शनच नाही, तर येथील कर्मचाऱ्यांच्या रूपाने माणुसकीचे दर्शनही घडत असल्याची चर्चा आता साईनगरीत होत आहे.

# ठाणे मनपा सार्वत्रिक निवडणूक संभाव्य दुबार मतदारांची छाननी पूर्ण

## ६७ हजाराहून अधिक मतदारांच्या नावासमोरील स्टार चिन्ह हटविणार

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीची पडताळणी करुन संभाव्य दुबार मतदारांची सखोल छाननी पूर्ण करण्यात आली आहे. या प्रक्रियेत एकूण ८३,६४५ संभाव्य दुबार मतदारांची तपासणी करण्यात आली. मतदार यादी पडताळणीत ६७०७१ मतदारांची नावे व फोटो एकमेकांशी जुळत नाहीत. अर्थात सदर मतदार 'दुबार मतदार' नाहीत. त्यामुळे या मतदारांच्या नावासमोरील स्टार (**) चिन्ह हटविण्यात येणार आहे. यामुळे या मतदारांना कोणत्याही अडथळ्याविना मतदानाचा हक्क बजावता येणार असल्याची माहिती उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी यांनी दिली. दरम्यान मतदार यादीत नाव व फोटो पूर्णतः समान असलेले १६,५७४ मतदार प्रत्यक्ष दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा मतदारांच्या नावासमोर स्टार (**) चिन्ह कायम ठेवण्यात येणार असून, सदर मतदारांच्या नावापुढे 'दुबार मतदार' असा शिक्का मतदार यादीत असणार आहे. अशा मतदारांना मतदान केंद्रावर विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून देऊन मतदान करता येईल. दुबार मतदान टाळण्यासाठी त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. संबंधित मतदाराने आपण एकाच ठिकाणी आणि एकदाच मतदान करीत असल्याचे लेखी हमीपत्र दिल्यानंतर मतदानाची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त उमेश बिरारी यांनी दिली. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, दुबार व बनावट मतदानास आळा घालणे तसेच पात्र मतदाराचा हक्क सुरक्षित ठेवणे, या उद्देशाने ही छाननी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मतदार यादी अचूक व दोषमुक्त असणे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने, प्रशासनाकडून ही कार्यवाही काटेकोरपणे करण्यात येत आहे. या सुधारणांमुळे ठाणे महानगरपालिका निवडणूक अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सुरळीतपणे पार पडेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.




# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची-पद्मश्री पोपटराव पवार

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




ओसिस इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर नाटिका सादर केली. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या दारिद्र्या पासून त्याचे मुलांचे हाल, कर्जबाजारीपणा यामध्ये दाखवण्यात आलेली आत्महत्या पाहून पालकांचे डोळे पाणवले. या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार व भैरवनाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, ज्येष्ठ संचालक रघुनाथ लोंढे, सचिव सचिन कोतकर, वैशालीताई कोतकर, ज्ञानदेव बेरड,जयसिंग दरेकर, साहेबराव कारले, बन्सी नरवडे, प्राचार्य सौ. कल्पना दरकुंडे, स्कूलचे सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, केडगाव मधील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना इंग्लिश माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम ही संस्था करत आहे. यामागे भानुदास कोतकर यांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणताही एक खेळ किंवा कला जोपासावी त्यामुळे जीवन आनंदी व निरोगी बनते. खेळातून व्यक्तीमत्व विकास होतो. सकारात्मक ऊर्जा मिळते. कोणतीही परीक्षा न देता, खेळातून क्लास वन अधिकारी होता येते. करिअरचा एक चांगला पर्याय म्हणून आपल्या आवडत्या खेळाकडे पाहिले पाहिजे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थी व पालकांना दिला.शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे म्हणाले की, प्रत्येक मूल हे हुशार असते, त्यांना घडविण्याचे काम शिक्षक व पालकांचे असते. मुलांचा कल पाहून त्या दिशेने त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मुलांचा मानसिक व शारीरिक विकास होण्याकडे देखील विशेष लक्ष देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांची भूमिका ही अतिशय महत्त्वाची ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमचे प्रास्ताविकात वैशाली कोतकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. या प्रसंगी विविध कला, क्रीडा व शैक्षणिक परीक्षांमध्ये व स्पर्धापरीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीतांवरील नृत्यप्रकार, देशभक्तीपर गीत, पारंपरिक लोकनृत्याचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# होळ जि.प.सर्कल मध्ये सुजाता ताई दीपक कांबळे यांच्या गावनिहाय संपर्क दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

आर.पी.आय. (आठवले) तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली होळ सर्कलमध्ये गावनिहाय संपर्क दौरा यशस्वीपणे पार पडला. या दौऱ्यात सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य तसेच महायुतीचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त आणि प्रचंड प्रतिसाद लाभला.

जनतेच्या सेवेत २४ तास तत्पर असलेले, ग्रामविकासाबाबत अनुभवी व चळवळीतील खंबीर नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या दीपक कांबळे यांच्याबाबत आज तुमच्यासारख्या नेतृत्वाचीच गरज आहे अशा भावना होळ सर्कलमधील नागरिकांनी व्यक्त केल्या. येत्या निवडणुकीत सुजाता ताई दीपक कांबळे यांनाच जनतेचा सकारात्मक व विश्वासार्ह प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र या दौऱ्यातून स्पष्ट झाले. गेल्या २० वर्षांपासून ग्रामपंचायतीवर दीपक कांबळे यांचे नेतृत्व राहिले असून या काळात विविध विकासकामे मार्गी लावण्यात त्यांना यश आले आहे. त्या विकासाच्या अनुभवाच्या बळावर आता होळ जिल्हा परिषदेसाठीही जनतेने भक्कम साथ द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या संपर्क दौऱ्याला जेष्ठ नेते रविंद्र जोगदंड,दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, रमेश निशिगंध, प्रशांत हजारे, सुरज काळे ,हरेंद्र तुपारे,हरेंद्र धिरे,सुरेश गायकवाड,विकास गायकवाड दयानंद खरात,अमोल दहिरे, संजय सोनवणे,आकाश लोंढे,राहूल शिंदे, गणेश कांबळे आकाश आदमाने, श्रीमंत गायकवाड , अमोल पौष,शरद पौळ, विनोद जोगदंड यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विकास, सेवा आणि सक्षम नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत सुजाता ताई दीपक कांबळे यांना पाठिंबा दर्शविला.







# अन्याय–अत्याचाराविरुद्ध निर्भीड लेखणी चालवा–प्रा.टी.पी.मुंडे

## पत्रकारांनी समाजाचा आरसा बनून सत्याची बाजू मांडावी–प्रदीप मुंडे



**दैनिक वादळ वार्ता**
**परळी (प्रतिनिधी)**

समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार व गुंडगिरीविरुद्ध पत्रकारांनी कोणत्याही दबावाला न झुकता निर्भीडपणे लेखणी चालवावी, असे स्पष्ट आणि ठाम आवाहन बहुजनांचे नेते व शिवसेना (एकनाथ शिंदे गट) चे नेते प्रा. टी. पी. मुंडे यांनी केले.

परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते.पत्रकार हा समाजाचा आरसा असून अन्यायाविरुद्ध आवाज बनणे हीच खरी पत्रकारिता असल्याचे मत यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या मुंडे यांनी व्यक्त केले.प्रा. टी. पी. मुंडे यांच्या कार्यालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात तालुका अध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष संपादक नितीन ढाकणे, सल्लागार भगवान साकसमुद्रे व सहसचिव शेख मुदस्सीर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समाजातील ज्वलंत प्रश्नांवर तसेच भ्रष्टाचाराविरुद्ध न भिता आवाज उठवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या मुंडे, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ गाणे, जिरेवाडीचे उपसरपंच राहुल कांदे, युवक नेते शिवा बडे, मधुकर ढाकणे, विलास कचले, प्रवीण घाडगे, सदाशिव गोडे, अविनाश गोडे यांच्यासह अनेक युवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जय बजरंग विद्यालयात रंगले संस्कृती, शौर्य आणि कलागुणांचे दर्शन घडविणारे स्नेहसंमेलन

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आशा एज्युकेशन फाउंडेशन संचालित जय बजरंग प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. या स्नेहसंमेलनातून भारतीय संस्कृती, परंपरा तसेच या मातीतील थोर शूरवीरांचा गौरवशाली इतिहास प्रभावीपणे सादर करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या बहुरंगी कलागुणांनी उपस्थित पालक, नागरिक आणि मान्यवरांना मंत्रमुग्ध केले.स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आशाताई फिरोदिया यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्षा राखीताई फिरोदिया, रेखाताई सारडा, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापकीय संचालक अमित बुरा, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, विद्यालयाच्या प्राचार्या संगीता पाठक, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, जय बजरंग



तपोवन माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वर्षाताई कुसकर यांच्यासह पालक, शिक्षकवृंद, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आशाताई फिरोदिया म्हणाल्या की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भवितव्य आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा व चिकाटीच्या बळावर शिक्षणात प्रगती करावी. शिक्षणाबरोबरच संस्कार, नैतिक मूल्ये व सामाजिक जबाबदारी यांची जोपासना होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.विद्यार्थ्यांनी अपयशाची भीती न बाळगता सातत्याने प्रयत्न करत राहावे, असे आवाहन करत त्यांनी डॉक्टर, अभियंता, शिक्षक, प्रशासक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थी उज्ज्वल भवितव्य घडवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी अशा स्नेहसंमेलनांसारख्या उपक्रमांची नितांत गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी विविध कला, क्रीडा व शैक्षणिक परीक्षांमध्ये व स्पर्धापरीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीतांवरील नृत्यप्रकार, देशभक्तीपर गीत, पारंपरिक लोकनृत्य तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिका व गीतनाट्यांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सौ.अश्वीनीताई घोडके तेलगाव जिल्हा परिषद गटातुन निवडणूक लढविणार

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकी साठी उमेदवार आपली उमेदवारी जाहीर करताना दिसुन येत आहेत.तेलगाव राखीव जिल्हा परिषद गटातुन निवडणूक लढविणार असल्याचे सौ. अश्विनीताई घोडके यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.दिंद्रुड येथे रहिवासी असलेले भाऊसाहेब घोडके हे आमला येथील मुळ रहिवासी आहेत.तेलगाव जिल्हा परिषद गटातील सर्व सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात त्यामुळे मतदार संघात त्यांच्याविषयी सहानुभूती आहे.भाऊसाहेब घोडके हे
भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव असुन भारतीय नरेंद्र मोदी संघ महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. तसेच संत रविदास महापीठाचे राष्ट्रीय प्रवक्ते आहेत.ब्रजवासी गोरक्षक सेनेचे महामंत्री म्हणून ते कार्यरत आहेत.त्यामुळे संघटनेच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेच्या मदतीला धावून



जात असतात त्यामुळे मतदार संघात त्यांच्या विषयी सहानुभूती व्यक्त होताना दिसत आहे.आपल्या अडीअडचणीला धाऊन येणारा भाऊसाहेब घोडके यांना निवडून आणण्या साठी जिवाचे रान करणार असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.स्वच्छ चारित्र्य असलेला कोरी पाटी असलेले भाऊसाहेब घोडके यांच्यासौभाग्यवती सौ.अश्विनीताई घोडके यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कार्यकर्त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा ग्राहक पंचायतच्या आवाहनास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद–अनिल बोर्डे

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना अतिवृष्टीची नुकसान भरपाई मिळण्यासाठी ई केवायसी करणे बंधनकारक आहे. याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी वारंवार व शासनाने आवहान करून देखील जिल्ह्यातील दोन लाख तेरा हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी केवायसी केली नव्हती.त्यानंतर ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी वारंवारआवहान केल्यानंतर बऱ्याच शेतकरी ग्राहकांना केवायसी करण्यात आली आहे. आता सध्या फक्त जिल्ह्यात २८ हजार शेतकरी ग्राहक केवायसी पासून वंचित आहेत. शेतकऱ्यांना वारंवार ग्राहक पंचायत महाराष्ट्र मार्फत जागृती केल्यामुळे मोठ्या प्रमाणात यश संपादन झाले आहे असे निदर्शनास आले आहे. उर्वरित सध्या २८ हजार शेतकरी ग्राहक ई केवायसी पासून वंचित आहेत. संबंधित शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त झाली नाही. संबंधित शेतकऱ्यांनी ई केवायसी करणे बंधनकारक आहे. तरी संबंधित शेतकरी ग्राहकाने तात्काळ ई केवायसी करून घ्यावी. याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने आवहान ग्राहक जागृती वारंवार करण्यात आली. त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. तरी उर्वरित शेतकरी ग्राहकाने ई केवायसी तात्काळ करून घ्यावी असे आवहान बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी पुन्हा केले आहे.



# पुस्तकी ज्ञानाला कौशल्याची जोड; जि.प.शाळा वरुळचा 'माझी शाळा–माझी कौशल्यशाळा' उपक्रम ठरतोय आदर्श!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान मिळवून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक आणि जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास होणे काळाची गरज आहे. हीच गरज ओळखून नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा वरूळ (केंद्र शिंदे) येथे 'माझी शाळा – माझी कौशल्यशाळा' हा अभिनव उपक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविला जात आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्दिष्टांना गवसणी घालणारा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाचा विषय ठरला आहे. विद्यार्थ्यांना केवळ साक्षर न करता त्यांना 'सक्षम' आणि 'आत्मनिर्भर' बनवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने एकत्र येत, शाळा हे केवळ माहिती देण्याचे केंद्र न राहता ते 'कौशल्य विकासाचे केंद्र' व्हावे, या विचारातून या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, संवाद कौशल्य आणि डिजिटल साक्षरता निर्माण व्हावी, यासाठी हा विशेष प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ शिक्षकांचाच नव्हे, तर स्थानिक समाजाचाही मोठा वाटा आहे. जून महिन्यापासूनच पालक मेळावे घेऊन या उपक्रमाची आखणी करण्यात आली. शाळेच्या नियमित वेळापत्रकात आठवड्यातून एक विशेष 'कौशल्य तास' राखून ठेवला जातो. गावातील सुतार, कुंभार आणि इतर कारागिरांना शाळेत पाचारण करून विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यवसायाचे प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांना 'हाताच्या कामाची प्रतिष्ठा



उमजत आहे. केवळ वर्गात बसून शिक्षण न देता, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे यासाठी विविध क्षेत्रभेटींचे आयोजन केले जाते. अलीकडेच विद्यार्थ्यांनी गणपती मूर्ती कारखाना आणि साखर कारखाना यांसारख्या ठिकाणी भेटी देऊन उत्पादनाची प्रक्रिया प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. तसेच शाळेत बागकाम, स्वच्छता, संगणक ज्ञान आणि गटकार्य यांवर विशेष भर दिला जातो. या उपक्रमामुळे वरूळ शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा बदल दिसून येत आहे: मुले आता स्वतःहून नवीन उपक्रम राबवण्यास आणि प्रश्न विचारण्यास धजावत आहेत. उपक्रम आनंददायी असल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली आहे. आपल्या पाल्याला व्यावहारिक शिक्षण मिळत असल्याचे पाहून पालकांचा शाळेवरील विश्वास दृढ झाला आहे.टीमवर्क आणि प्रकल्प पद्धतीमुळे मुलांमध्ये नेतृत्व आणि निर्णयक्षमता विकसित होत आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जाणारा हा उपक्रम आज एक 'आदर्श मॉडेल' म्हणून नावारूपास आला आहे. जि. प. शाळा वरूळने दाखवून दिले आहे की, मर्यादित संसाधने असतानाही इच्छाशक्तीच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलांचे भविष्य उज्ज्वल करता येते.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077